# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३-विवि/**१९५**/२०२२
दिनांक : १७.१२.२०२२

प्रति,
**मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,**
संलग्नित संबंधित महाविद्यालये व
पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : कौशल्य विकास योजनेअंतर्गत विद्यापीठाच्या मानव संसाधन विकास केंद्र यामधून प्रशिक्षित झालेले प्रशिक्षक यांच्या एक दिवसीय कार्यशाळा आयोजन स्थळ बदलाबाबत.**
**संदर्भ : विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३-विवि/१९१/२०२२ दिनांक १४.१२.२०२२**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सत्र २०२२-२०२३ मध्ये राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास योजनेच्या तयारी संदर्भात चर्चा करण्याकरीता विद्यापीठाचे मानव संसाधन विकास केंद्र यामधून प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षकांची एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन **दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता** मा.कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली स्व.डॉ.के.जी.देशमुख सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे करण्यात आले आहे. याबाबत आपणांस उपरोक्त संदर्भाकित पत्रानुसार कळविण्यात आले होते.

परंतु सदर कार्यशाळेचे आयोजन स्व.डॉ.के.जी.देशमुख सभागृहा ऐवजी **अधिसभा सभागृह,** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे **दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता** करण्यात येत आहे. कृपया झालेल्या स्थळाच्या बदलाची नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी :
१) मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२) प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
३) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
४) प्र.संचालक, युजीसी-मानव संसाधन विकास केंद्र (एच.आर.डी.सी.)
५) संबंधित समन्वयक व प्रशिक्षक, कौशल्य विकास योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ